**सोलापूर महानगरपालिका,**

जा.क्र.न.अ./बां.प./273
बांधकाम परवानगी विभाग
सोलापूर. दि.28/ 6 /२०१८.

# जाहिर प्रसिद्धीकरण

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील ५२ क नुसार दि.३१/१२/२०१५ किंवा तत्पुर्वी झालेली अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषीत करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये नियमात सुधारणा करुन त्याप्रमाणे उपरोक्त संदर्भान्वये शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील दि.३१/१२/२०१५ किंवा तत्पुर्वी शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावलीचा भंग करुन करण्यात आलेली रहिवास किंवा वाणिज्य किंवा सार्वजनिक निमसार्वजनिक किंवा औद्योगिक वापरातील अनाधिकृत बांधकाम धारकांना कळविण्यात येते की त्यांनी खाली नमुद प्रमाणे अनाधिकृत बांधकामे नियमित करुन घ्यावीत.

- रस्ता रुंदीच्या प्रमाणात अनुज्ञेय उंचीपेक्षा जास्त उंचीचे इमारती.
- अनुज्ञेय वापरा व्यतिरीक्त अन्य वापराकरीता वापरात असलेली इमारत उदा. रहिवास, वाणिज्य व मिक्स वापर.
- अनुज्ञेय F.S.I. पेक्षा जास्त, F.S.I. वापरण्यात आलेली अनाधिकृत बांधकामे (वाढीव F.S.I. ३०% मर्यादीत)
- अनुज्ञेय सामासीक अंतरापेक्षा कमी सामासिक अंतरे सोडून करण्यात आलेली अनाधिकृत बांधकामे.
- अनुज्ञेय पार्किंग क्षेत्रापेक्षा कमी पार्किंग क्षेत्र सोडून बांधण्यात आलेली अनाधिकृत बांधकामे.
- अनुज्ञेय पेक्षा कमी Duct (ओपन चौक) सोडून बांधण्यात आलेली इमारती.
- जिना, पॅसेज, बाल्कनी, टेरेसचा गैरवापर करण्यात आलेली बांधकामे.

अनाधिकृत बांधकाम धारकांनी सोलापूर महानगरपालिका बांधकाम परवानगी विभागाकडे रीतसर सर्व कागदपत्रे व नकाशे दि.०१/०७/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ पर्यंत बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर करावे. तसेच अनाधिकृत रेखांकन, अनाधिकृत एकत्रिकरण व विभागणीचे प्रस्ताव नगर रचना विभागाकडे सादर करावेत. सदरची बांधकामे उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे डेव्हलपमेंट चार्जेस / कंपौंडींग चार्जेस, इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपेंट चार्जेस व प्रिमियम चार्जेस इत्यादी भरुन नियमित करुन घ्यावेत. सदर मुदतीनंतर जे अनाधिकृत बांधकाम धारक महानगरपालिकेकडे नियमीत करणेकरीता प्रस्ताव सादर करणार नाहीत अशी बांधकामे निष्कासीत करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.